श्री वरद विनायक, महाड




# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १७८ वा ❑ रविवार दि.३१ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## वीज कोसळून मृत्यू होण्याचे प्रमाण चिंताजनक

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

वीज कोळसलून मृत्यू होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. एप्रिल ते जुलै २०२५ दरम्यान वीज पडून पावसाने १,६२१ लोकांचा मृत्यू झाला, ज्यामध्ये १० ते १२ एप्रिल दरम्यान बिहार आणि उत्तर प्रदेशमध्ये १०० मृत्यूची नोंद झाली, ज्यामध्ये बहुतेक शेतकरी शेतात काम करताना मृत्युमुखी पडले. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो नुसार, २००२ ते २०२४ दरम्यान भारतात हवामानाशी संबंधित मृत्यूंपैकी जवळजवळ ४६% मृत्यू केवळ वीज पडून झाले. १९६७ ते २०२० पर्यंत ही संख्या १,०१,००० पेक्षा जास्त होती.

पूर्व भारतात वीज पडण्याचे प्रमाण जास्त होते. परंतु आता तो मध्य, उत्तर, महाराष्ट्र ईशान्य, किनारी आणि हिमालयीन प्रदेशात पसरला आहे.मध्य प्रदेश आता सर्वात जास्त प्रभावित राज्य आहे, तर राजस्थानमधील बिकानेर आणि चुरू जिल्हे हे टॉप हॉटस्पॉट बनले आहेत.

हवामान बदलामुळे तापमान आणि आर्द्रता वाढून वादळांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे. तज्ञांच्या मते, प्रत्येक १ अंश सेल्सिअस तापमान वाढीमुळे आर्द्रतेत ७% वाढ होते, ज्यामुळे वीज पडण्याची शक्यता १०-१२% वाढू शकते. बंगालच्या उपसागराच्या समुद्राच्या तापमानात ४ अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे, ज्यामुळे पूर्वेकडील राज्यांमध्ये आर्द्रता आणि वीज पडण्याचा धोका वाढला आहे.

पूर्वी ग्रामीण भागात वीज पडण्याच्या घटना अधिक होत्या, परंतु आता वेगाने वाढणाऱ्या शहरी भागातही हा धोका वाढत आहे. शहरी उष्ण बेटाचा परिणाम, वायू प्रदूषण आणि जलद बांधकाम उपक्रमांमुळे वादळांची तीव्रता वाढत आहे.२०२४-२५ मध्ये दिल्लीत वीज कोसळण्याच्या अनेक मोठ्या घटनांची नोंद झाली, ज्यामध्ये २८ जून २०२४ रोजी घडलेल्या घटनेचा समावेश आहे, ज्यामुळे आयजीआय विमानतळाच्या टर्मिनल-१ वरील भिंत कोसळली.

जगभरात आणि भारतात हवामान बदलामुळे वीज कोसळण्याचे प्रमाण वाढत असल्याचे वैज्ञानिक पुरावे वाढत आहेत. शहरीकरण, वायू प्रदूषण आणि बांधकाम यासारख्या मानवी क्रियाकलापांमुळेही वादळांची तीव्रता वाढत आहे, ज्यामुळे शहरी भागातही वीज कोसळण्याचा धोका वाढत आहे.

विज कोसळून मृत्यू होण्याचे प्रमाण कसे रोखता येईल,हा प्रश्न अतिशय गहन आणि चिंताजनक आहे.वीज कधीही कोसळू शकते. पावसाळ्यापूर्वी जून-जुलैमध्ये हे अधिक सामान्य आहे. वीज पडण्याच्या बहुतेक घटना दुपार ते संध्याकाळच्या दरम्यान दिसून येतात.

उंच टोकदार इमारती आणि झाडांवर वीज पडण्याची शक्यता जास्त असते. अशा ठिकाणांपासून दूर राहण्याची गरज आहे. धातूचे मचान, धातूची उपकरणे, पाण्याचे पाईप किंवा प्लंबिंग, वीज वाहक साहित्य किंवा पृष्ठभागांशी संपर्क टाळावा. उंच इमारती, टेकड्या, विजेचे खांब, टेलिफोनचे खांब, उंच झाडे, छप्पर, मचान, धातूच्या शिड्या, बुलडोझर, क्रेनसारख्या मोठ्या यंत्रांपासून आणि ट्रॅक्टरसारख्या वाहनांपासून दूर रहावे. स्फोट होण्याची शक्यता असलेल्या भागातून आणि औद्योगिक ठिकाणीन ताबडतोब सुरक्षित ठिकाणी जावे. धातूच्या वाहनांमधून विद्युत प्रवाह वाहण्याची शक्यता असल्याने, ताबडतोब सुरक्षित ठिकाणी जावे. जर तुम्ही रस्त्यावर असाल तर ताबडतोब इमारतीच्या आत आश्रय घ्यावे. विजेचा गडगडाट ऐकल्यानंतर, किमान ३० मिनिटे सुरक्षित ठिकाणी राहावे.

विद्युत आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांपासून अंतर ठेवावे.त्यांना पॉवर प्लगपासून डिस्कनेक्ट करावे. कोणत्याही भिंती, फरशी, विद्युत प्रणाली, रेडिओ आणि टेलिव्हिजन रिसेप्शन सिस्टमच्या तारांमधून वीज वाहू शकते. घरात, ऑफिसमध्ये अर्थिंगची खात्री करावी उघड्या खिडक्या, दरवाजे, धातूच्या पाईप्स इत्यादींजवळ उभे राहू नये. धातूच्या पाण्याच्या पाईप्समधून वीज वाहू शकते.

शेतकऱ्यांसारखे संवेदनशील लोक वेळेत सुरक्षित राहू शकतील यासाठी सरकारकडून मोबाईल फोनवर अलर्टसारख्या सुरक्षितता माहिती प्रणालीची आवश्यकता आहे. वीज कोसळण्याचा धोका कमी करण्यासाठी आपल्याला हिरव्या आणि शाश्वत उपायांवर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे.

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेकडून संजीव कांबळे यांचा गौरव

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेने नुकतेच सेवानिवृत्त झालेले महापारेषणचे अधीक्षक अभियंता (बांधकाम विभाग) संजीव परशुराम कांबळे यांचा गौरव केला. संजीव कांबळे हे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून, ते महापारेषणमध्ये स्थापत्य मंडळ, छत्रपती संभाजीनगर येथून अधीक्षक अभियंता म्हणून सेवानिवृत्त झाले.

२९ ऑगस्ट २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या प्रशासकीय इमारतीत हा सेवापूर्ती व गुणगौरव सोहळा पार पडला. या सोहळ्याला माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य व प्रभारी मुख्य अभियंता, महापारेषण छत्रपती संभाजीनगर, श्री रंगनाथ चव्हाण, डॉ. श्री दमगिरे, तसेच संघटनेच्या सहसचिव व उप कार्यकारी अभियंता सीमा गाडेकर आवर्जून उपस्थित होत्या.

यावेळी, संघटनेच्या वतीने श्री संजीव कांबळे यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.

उपस्थितांनी श्री कांबळे यांना पुढील निवृत्त जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांचा कामाप्रती असलेला दृढ संकल्प आणि उत्कृष्ट नेतृत्वगुण हे सर्व सहकाऱ्यांसाठी एक आदर्श ठरले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक तरुण अभियंत्यांनी या क्षेत्रात मोलाची प्रगती केली, असेही यावेळी सांगण्यात आले.



# अमेरिकेपुढे आशियाचे आव्हान : भारत-जपान मैत्रीचा सूर्योदय

ज्योतिर्मय 📖 साहित्य

‘‘अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताविरुद्ध ५० टक्के टॅरिफ लादल्यानंतर सबंध आशिया खंडातील देश अमेरिकेविरुद्ध एकवटले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जपान आणि चीन दौरा हा आशियाई ऐक्याचा बुलंद आवाज म्हणून महत्त्वाचा आहे. विशेषतः २१ वे शतक हे आशियाचे शतक आहे, हे जगाला ठासून सांगण्याचा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी देत आहेत.‘‘



प्रस्तावना

२१ वे शतक हे आशियाचे शतक आहे. भारत आता सबंध जगाचा विश्वगुरू म्हणून उदयास आला आहे आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या कार्यपद्धतीत सुधारणा असो, की जागतिक व्यापारातील असमतोल असो, या सर्व बाबतीत एक समन्यायी आणि संतुलित भूमिका घेऊन भारत जगाचे नेतृत्व करत आहे. हमास- इस्रायल संघर्ष शांततेने आणि कुटनीतीने सोडविण्यावर भारताचा भर आहे. तथापि, डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ बॉम्बने जगाची झोप उडाली आहे. अशावेळी अमेरिकेच्या दादागिरीला जबरदस्त प्रतिशह देण्याचे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत आणि चीनदौऱ्याचे भू-राजनैतिक दृष्टीने विशेष महत्त्व आहे. त्यांच्या नव्या भूमिकेमुळे आशियाच्या राजकारणात सत्ता समतोलाचे नवे समीकरण मांडले जात आहे आणि भारताची नैतिक आध्यात्मिक आणि सामाजिक शक्ती जबरदस्त वाढली आहे. त्याचा प्रत्यय गेल्या महिनाभरातील घटना आणि घडामोडींमुळे येत आहे, ही गोष्ट प्रकर्षाने अधोरेखित केली पाहिजे. नव्या जगामध्ये भारत एक समर्थ आणि तेवढाच बलशाली देश म्हणून उदयास आला आहे. भारताची कृषी, उद्योग, शिक्षण, माहिती, तंत्रज्ञान, संरक्षण, उत्पादन या क्षेत्रांतील मोठी गरुडझेप पाहता अमेरिकेसारख्या महासत्तेला पोटदुखी होणे साहजिक आहे. परंतु, कोणाची पोटदुखी होणार म्हणून आपण माघार घ्यावयाची नाही किंवा त्या महासत्तेपुढे झुकावयाचे नाही, हे सुद्धा समर्थ भारताचे एक मौलिक आणि व्यावसायिक लक्षण आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी मोदी यांना चारवेळा फोन केला. परंतु, मोदी यांनी त्यांचा फोन उचलला नाही असे वृत्त जर्मनीतील एका वृत्त संस्थेने दिले आहे. त्यावरून भारताचा कणखरपणा स्पष्ट होतो.

मैत्रीचा नवसूर्य प्रकाशमान

भारत -जपान मैत्रीचा नवसूर्य पुन्हा एकदा प्रकाशमान झाला आहे. भारताचे ॲक्टिस्ट म्हणजे पूर्वेकडे पहा आणि कृती करा हे धोरण तसेच जपानचे पेन – एशिया धोरण या दोन्हींमध्ये एक समान सूत्र आहे. भारताने आग्नेय आशियाई देश, आशियान देश आणि हिंद प्रशांत क्षेत्रातील देश यांचे गेल्या दहा वर्षांत प्रभावीपणे संघटन केले आहे. त्यामुळे केवळ अलिप्तता वादाचे तुणतुणे न वाजविता भारताने आता आपले नॉन अलाइन धोरण अधिक सक्रिय आणि अधिक गतिमान केले आहे. असे करताना भारत आपल्या स्वहिताचे रक्षण करतो आणि आपल्या हितसंबंधांचे रक्षण करताना त्याच्या मार्गात येणाऱ्या कुठल्याही राष्ट्राला भीक घालणार नाही, ही भारताची रोखठोक भूमिका पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केली आहे. भारत जपान मैत्रीचा नवसूर्य पुन्हा एकदा प्रकाशमान झाला आहे. जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्याशी




झालेल्या सकारात्मक सुसंवादातून अनेक मौलिक रत्ने प्राप्त झाली आहेत. जपानने भारतामध्ये ६८ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक संरक्षण क्षेत्रात करण्याचे ठरविले आहे. दोन्ही देशांनी परस्परातील सुरक्षा संबंध अधिक दृढ करण्याचे मान्य केले आहे. जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्या मते भारताची बाजारपेठ एवढी मोठी आहे की, तिच्यातील चैतन्यशील प्रवाहाचे दर्शन जगाला नव्याने होत आहे. भारत -जपान आर्थिक संबंध आणि व्यापारी गुंतवणुकीमुळे दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेला वाढीव चालना मिळू शकेल. भारत व्यापार क्षेत्रात विविधता आणू शकतो तसेच नव्या दिशांनी नवनव्या क्षेत्रात गुंतवणूक करू शकतो. या दृढतर भावनेने नवा सामंजस्य करार विकसित केला जात आहे. उभयतांमध्ये तेरा सामंजस्य करारांवर सह्या करण्यात आल्या. नवीन प्रयत्नांमुळे दोन्ही देश व्यवसाय व व्यापार क्षेत्रांत नव्या क्षितिजांचा शोध घेऊ शकतात, या दृढतर भावनेने या सामंजस्य कराराची आखणी करण्यात आली आहे.

आशियाई शतकाला आकार

२१ वे शतक हे आशियाचे शतक आहे. परंतु, या आशियाई शतकाला आकार व नवे रूप देण्याचे कार्य भारत व जपान यांना मिळून करावे लागणार आहे. भारतासारख्या बहुआयामी संस्कृतिक आणि संपन्न राष्ट्राच्या ऐतिहासिक क्षमतांवर जपानचा विश्वास आहे. त्यामुळे जपानने भारताच्या विकासात विज्ञान, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधांचा विकास तसेच अत्यंत महत्त्वपूर्ण अशा वेगवान बुलेट ट्रेन प्रकल्पाची आखणी व अंमलबजावणी याबाबत जपान सहकार्यासाठी वचनबद्ध आणि कृतीबद्ध आहे. भारताची भक्कम लोकशाही प्रणाली आणि आर्थिक स्थिरता ही नव्या जगाचे आशास्थान आहे. किंबहुना, भारत जसजसा सामर्थ्यवान होईल तसतसा नव्या जगात विकास आणि समृद्धीचा नवा मंत्र सर्व दूर घुमू लागेल. भारताच्या प्रगती व स्थैर्यामध्ये विश्वाची प्रगती आहे, हे वसुधैव कुटुंबकम् या बोधवाक्यातून भारताने जी-वीस शिखर परिषदेस जगाला दाखवून दिले आहे. उद्योग क्षेत्रातील जपानची उत्कृष्टता आणि भारताची उद्यमशील गतिमान भागीदारी यामुळे जगामध्ये आणि विशेषतः आशियामध्ये प्रगती व स्थैर्याचा नवा अध्याय सुरू होऊ शकतो. दोन्ही देशांमधील आर्थिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक सहकार्य अधिक गतिमान होईल, असा विश्वास उभयनेत्यांनी व्यक्त केला तो सार्थ आहे. भारत २०३० पर्यंत ५०० जी जी वॅट अक्षय स्वच्छ ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करणार आहे, असे मोदी यांनी आत्मविश्वासपूर्व विधान केले. भारत जगाची कौशल्ये राजधानी म्हणून उदयास आला आहे आणि भारताचे कुशल कामगार जगाची प्रगती साध्य करण्यासाठी सर्व प्रकारच्या तांत्रिक गरजा पूर्ण करतील, हे सुद्धा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधोरेखित केले आहे. जपान हे तंत्रज्ञानाचे महाशक्ती ग्रह आहे.

(क्रमशः)

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - ३१



आपण जे 'वास्तुशास्त्र पेंटींग' निर्माण करतो, ते केवळ उपलब्ध आणि मिळविलेल्या तपशीलावरच आधारित असते. ते पेंटींग निर्माण करतांना आपण कुठल्याही प्रकारची 'तडजोड' स्विकारत नाही, आपल्या पैकी आणि ही लघुलेख माला वाचन करणाऱ्या बव्हंशी वाचकांना "पंचांग" हे आडव्या आकाराचे पुस्तक माहिती असेलच.

३६५ दिवसांचे ग्रह, नक्षत्र, वार, तिथी, तारे, चरण, सण, धार्मिक योग करण चरण... बापरे...!! संपूर्ण तपशीलवार नैसर्गिक-भौगोलिक-ब्रह्मांडीय आकाशाची स्थिती सांगितलेली असते. त्या 'पंचांगाचा आधार आपण 'वास्तुशास्त्र पेंटींग' निर्माणास घेतो.

पंचांगाची कालगणना आपण अंदाज घेण्याचा नुसता प्रयत्न जरी केला तरी मती कुंटीत होते. श्री सूर्य सिद्धान्त मताने श्री महाविष्णूच्या नाभिकमला पासून ब्रह्मदेवाची निर्मिती झाली. त्या ब्रह्मदेवाचे आयुष्य शंभर वर्षाचे आहे. ब्रह्मदेवाच्या एका दिवसात १४ मनू तयार होतात. त्या एकेका मनूत महायुगे होतात. एका महायुगात ४३ लक्ष २० हजार एवढीवर्षे आहेत. यावरून ब्रह्मदेवाचे आयुष्य ३१,१०,४०,००,००,००,००० वर्षे एवढे ठरते. या एवढ्या काळाला 'महाकल्प' असे नांव ऋषी-मुनींनी दिलेले आहे.

ज्योतिष आणि खगोलतज्ज्ञ, गुरु भास्कराचार्य म्हणतात, 'सध्याच्या पंचांगात ब्रह्मदेवाच्या ५१ व्या वर्षातील पहिल्या महिन्याच्या पहिल्या पक्षाच्या पहिल्या दिवसाच्या १३ घटका ४२ पळे व तीन अक्षरे होऊन गेली आहेत'. त्यापुढील काळाप्रमाणे हे पंचांग सुरु असून त्यात नमूद केल्याप्रमाणे तिथी, वार, नक्षत्र, योग, करण, चंद्र - सूर्याचं उद्यास्त, भरती ओहोटीच्या वेळा इ. सर्व एकदम अचूकपणे येत आहेत. मग ही, माहिती जी अगोदरच लिहून ठेवलेली आहे ती चूक आहे असे म्हणण्याला वाव नाही. म्हणून नक्षत्रादी सर्व माहिती ही अतिप्राचीन आहे आणि ती सर्व सत्य आहे. या माहितीच्या आधारावरच "वास्तुशास्त्र पेंटींग" जे आपण निर्माण करतो, त्याचा परिणाम म्हणूनच गेल्या २० वर्षात उपयोग कर्त्याला अद्भूत रित्या मिळालेला आहे.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## जात्यावरच्या ओव्या......

भाऊ करते व्याही
वढद माहेरचा राजा
हायली वर उभा
देतो पंगतीला रजा ||२३३||

सखु बहिणीचं
मला भारीच लह्यण
सुखाची ठेव देवा
मही वडील बहिण ||२३४||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर


## श्री गणेशाला दुर्वा प्रिय का...?

ज्योतिर्मय साहित्य

दुसरी कथा अशी आहे की, अनलासुर नावाचा एक राक्षस होता. अत्यंत जुलमी आणि अन्यायी. देवांनाही त्याच्यापुढे हार खावी लागत होती. अशा वेळी संकटातून कोण वाचवणार ? तर विघ्नहर्ता गजानन ! म्हणून सगळे देव गणपतीला शरण गेले. त्यावेळी गणपती बाल रुपात प्रकट झाला. त्याने देवांना मी अनालासुराचा निःपात करतो. तुम्ही निश्चिंत राहा असे आश्वासन दिले.


बालगणेशाने अनलासुराला युद्धाचे आव्हान दिले. दोघांमध्ये भयंकर युद्ध झाले. अनलासुर हा अक्राळविक्राळ, डोळ्यातून अग्निज्वाला बाहेर पडणारा आणि प्रचंड मोठा आवाज असणारा होता. त्याच्या आवाजाने धरणी सुद्धा कंपित होत असे. त्याने मोठ्या आवेशाने बालगणेशालाच गिळून टाकण्याचा प्रयत्न केला. पण गणेशाने आपल्या दैवी सामर्थ्याने त्यालाच गिळंकृत केले. अनलासुर ठार झाला. सर्वत्र आनंदीआनंद झाला. देवांनी गणेशाचा जयजयकार केला. पण अनलासुराला गिळल्याने गणेशाच्या अंगाचा प्रचंड दाह होऊ लागला. तो शांत करण्यासाठी पार्वतीने त्याला चंदनाचा लेप लावला. शंकराने त्याच्या मस्तकावर चंद्र ठेवला. म्हणून श्री गणेशाला भालचंद्र हे नाव मिळाले. तसेच त्याच्या अंगाची आग शांत व्हावी म्हणून आपल्या गळ्यातील नाग त्याच्या कमरेला बांधला. एवढे करूनही आग कमी होईना. तेव्हा भगवान विष्णूंनी आपल्याकडील कमळ त्याला दिले. म्हणून त्याला पद्मपाणी हे नाव मिळाले. वरुणाने पाण्याचा अभिषेक केला.






या नंतर काही ऋषिगण तेथे आले. त्यांनी प्रत्येकी एकवीस दुर्वांची जुडी श्री गणेशाच्या मस्तकावर ठेवली. या उपायामुळे त्याला तत्काळ बरे वाटू लागले, त्याच्या अंगाचा दाह कमी झाला. म्हणून श्री गणेशाने सांगितले की जो कुणी मला श्रद्धेने दुर्वा अर्पण करील, त्याला हजारो यज्ञांचे आणि तपश्चर्येचे पुण्य प्राप्त होईल. तीर्थयात्रा आणि दानधर्म केल्याचे पुण्य मिळेल. म्हणून आपण श्री गणेशाला दुर्वा वाहतो. दुर्वांमध्ये शीतलता आहे. उष्णतेच्या विकारावर दुर्वांचा रस उपयोगी आहे.

दुर्वांचे महत्व सांगणारी दुसरी एक कथा आहे. पूर्वी कौंडींण्य ऋषी आपल्या आश्रमात आपली पत्नी आश्रया हिच्यासोबत राहत होते. आपल्या पत्नीला श्री गणेशाची महती सांगताना त्यांनी तिला दुर्वांचे महत्व सांगितले. पण ते ऐकून तिला आश्चर्य वाटले. एक प्रकारे तिने अविश्वास प्रकट केला. तेव्हा तिला दुर्वांचे महत्व पटावे म्हणून त्यांनी तिच्या हातात एक दुर्वांची जुडी दिली आणि सांगितले की इंद्राकडे जाऊन तिच्या भाराचे सुवर्ण घेऊन ये. आपल्या पतीच्या आदेशानुसार आश्रया इंद्राकडे गेली. आणि तिने आपल्या पतीचा निरोप इंद्राला सांगितला. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## बद्धलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

जसा अंध माणूस अंधारात चाचपडतो. तसा बद्ध माणूस अज्ञानाच्या अंधारात जगतो. आंधळाल्या ड़ोळे नसल्याने चारी दिशा शुन्य वाटतात, तशीच बद्धाची अवस्था असते. ज्ञानाचा अभाव असल्याने परमात्मा आतबाहेर असून बद्धाला तो असून नसल्यासारखा वाटतो. भक्त, ज्ञानी, तपस्वी, योगी, विरक्त, सन्यासी हे समोर असुनही त्याला ते दिसत नाहीत. किंवा अशा लोकांची योग्यता त्याला कळत नाही.


२) चांगलेकर्म, वाईटकर्म, धर्म, अधर्म हे तो पहात नाही किंवा समजून धेत नाही. साधासोपा,परमार्थ मार्ग पहात नाही समजावून घेत नाही.

३)खरे शास्त्र कोणते, सत्संगात कसे रहावे, चांगले वाईट कोणते पहात नाही. त्यांचा विचार करत नाही. सारासार विवेकबुद्धी, स्वधर्माबदूल आदर, परोपकार, ज्ञान व दान, पुण्य हे काहीही कलत नाही किंवा त्याविषयी वैचारिक बैठक तयार नसते.

बद्धलक्षणाच्या माणसाला भूतदया नसते, देहाची

स्वच्छता नसते. अत:करण शुध्द नसते. मवाळवाणी नसते. भक्ति, मुक्ति, वैराग्य, साधनध्यान मोक्ष साधन या विषयावर तो काही बोलत नाही. किबहूना त्याच्याकडे तो बघत नाही.

समाजातील असे अनेक लोक आहेत की ते फक्त आणि फक्त स्वतः चा विचार करतात. आपल्या स्वभावाने, आपल्या बोलण्याने समोरचा दुखावला जातो हट्टी, दुराग्रही लोक समाजात जागोजागी आढळतात. त्यातून आजकालच्या सामाजिक परिस्थिती चा विचार केला तर भोगवादी विचारसरणी वाढली आहे. नको नको वाटेल अशी प्रसिद्धी माध्यमे वाईट विचारांना प्रोत्साहन देत आहेत. संतसहवास, आदर्श विचार चिंतनशील स्वभाव, खरे ते खोटे व खोट्या गोष्टींना प्रतिष्ठा मिळत आहे. हे सर्व बद्धलक्षण आहे. **(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नाम हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन ।

ज्योतिर्मय साहित्य

संसारातील सार । आपला करावा रघुवीर ।। कलि अत्यंत मातला। नीतिकर्तव्याचा विसर पडला ।। अनाचार होतसे फार । आता नाही रामावाचून दुजा ठाव ।। चोराने घरफोड केले । मग जागृतीचे कारण नाही उरले ।। म्हणून असावी सावधान वृत्ति । अखंड राखावी भगवंताची स्मृति।। भगवंतासी अनन्य होता । दुःखाची नाही तेथे वार्ता ।। अभिमानवृत्ति सोडावी बरी । त्यास घडे रामसेवा खरी ।। सरे मीपणाची उरी। ब्रह्मरूप दिसे चराचरी ।। म्हणून ज्याने जन्माला घातले । ज्याने आजवर रक्षण केले ।। तो माझा धनी हे ठेवून चित्ती । भावे भजावा रघुपति ।। रामाचे व्हावे आपण । राम जोडावा आपण ।। हेच जन्माचे । प्रपंचाचे, मुख्य कारण ।। म्हणून रामाविण न मानी कोणी त्राता । धन्य त्याची माता पिता ।। प्रपंच तसा परमात्म्यावाचून। हे जसे अलंकार सौभाग्यावाचून ।। अलंकार सर्व घातले । पण सौभाग्यतिलक न लावले । तैसे रामाविण राहणे । आहे खरे ।। ऐहिक आणि पारमार्थिक । न जाणावे एकाहून एक परते ।। ऐहिक आणि पारमार्थिक सुख। रामावाचून नाही देख ।। म्हणून शुद्ध असावे आचरण । तसेच असावे अंत:करण । त्यात भगवंताचे स्मरण । हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन ।।

रामचरणावर ठेवावा विश्वास । हेच परमार्थाचे भांडवल खास ।। ऐहिक वागण्यात रामाचे स्मरण । हीच परमार्थाची खरी शिकवण ।। माझे हित भगवंताचे हाती । हीच ठेवावी मनाची प्रवृत्ति।। राम कर्ता ही असावी भावना । तो जे करील ते आपल्या हिताचे जाणा ।। भाव ठेवावा रामापायी। पण व्यवहार चुकू न देई ।। परमात्म्याचे राखणे अनुसंधान । हाच परमार्थाचा मुख्य मार्ग जाण ।। बाह्यांगाने करावी प्रपंचाची संगति । चित्ती असावा एक रघुपति ।। प्रयत्न करणे आपल्या हाती। यश देणे भगवंताचे हाती ।। प्रयत्नाला न पाहावे पुढे मागे । परि परमात्मा उभा आहे मागे। ही ठेवावी जाणीव मनामध्ये ।। प्रपंचात दक्षतेने वागत जावे । धीर सोडू नये । भगवंताचे आधारावर निभ्रांत असावे ।। सर्व कामधंदा घरी करी । पण चित्त लेकरांवरी । ऐसे जैसे करी जननी जाण। तैसे वागावे आपण । काया गुंतवावी प्रपंचात । मन असावे रघुनाथात । नीतिधर्माचे आचरण । पवित्र असावे अंत:करण । त्यात कर्तव्याची जोड पूर्ण । त्या सर्वात राखता आले अनुसंधान । तर याविण दुजा परमार्थ नाही जाण ।। व्यवहार उत्तम प्रकारचा केला । पण परमात्मा विसरला । तो व्यवहार दुःखच देता झाला ।।

१०. जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

## ।। संत महात्म्य ।।

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

मनाचा मृत्यू म्हणजे समाधी ही व्याख्या आपण पूर्वी ऐकलेली आहे ज्यावेळेस प्राण उर्ध्वगामी होतो मन जवळपास संपल्यात जमा असते मी तू पणाची जाणीव उरतच नाही बुद्धीही कुंठीत होते आणि अहंकार लीन असतो त्यावेळेसच अविद्येचे मळभ संपल्या जाते. सूक्ष्म स्तरावरील विकारांचे जमाव नष्ट केले जातात. योगाग्नीने शरीरात अग्नि तांडव सुरू केलेले असते. यामध्ये पापांची किल्मिशे जळून भस्म होतात. मन निष्पन्द असते. जाणीव तर असते पण ती कोणाला येते याविषयी शब्दात मांडणे अवघड जाते. अशा वेळेस आत्मा पुन्हा तेजपुंज स्वरूपात बुद्धीवर प्रकाश टाकतो म्हणून हृदयस्त परमात्मा म्हणजेच आत्मा हा तेजोमय रीतीने लकाकला आहे, त्या तेजाचे वर्णन ज्ञानेश्वर माऊली येथे असे करीत आहेत.

साकार निराकार शून्या शून्य दिठा
रुपी रूप वाटा हरी माझा

साधनेच्या निम्नस्तरावर भगवंताचे सगूण रुप दर्शन होत असते. या सगुणाच्या दर्शनानंतर त्याची साधना निर्गुण निराकार परमात्म्याच्या अनुभव घेण्यासाठी पुढे सरकते. यानंतर ज्ञानप्राप्ती म्हणजेच आत्म्याचा अनुभव येतो. हा निर्गुण निराकार परमात्म्याचा अनुभव आहे. आत्मा व परमात्मा हे एकच आहेत हे आता जाणवते.

ही साधना ज्ञानानंतर पुढे सविकल्प समाधी चा अभ्यास दृढ करून नंतर निर्वी कल्प समाधीकडे झेप घेते. या निर्वी कल्प समाधीत एक उच्चतम अनुभव आहे. तो म्हणजे महा शून्याचा. हा महा शून्याचा अनुभव, करोडो करोडो लोकांमधून एखाद्याच भाग्यवंतास अनुभवता येतो.

आपल्या भोवती काहीही नाही. केवळ निर्वात पोकळी आहे. खूप अंधकार दाटलेला आहे. या पोकळीचा आदी अंत कुठेच लागत नाही.हे केवळ जाणवते. पण देह भावांना पूर्णपणे संपलेली असते. मन हे जवळपास मेल्यात जमा असते. विचार नसतातच फक्त या निर्वात पोकळीचा अनुभव घेणारा कोणीतरी आहे. त्यास अनुभव येत आहेत असे भासते. ही समाधीची प्रगाढ अवस्था आहे. यात साधक बऱ्याच वेळेस बाहेर कसे पडावे हे त्याला कळत नाही. या समाधीत अखंड अमर्याद महानंद मिळत असतो.

सर्वत्र अंधकार दाटला आहे. निर्वात पोकळी आहे, आणि काहीही नाही हा निर्गुण निराकार परमात्म्याचा प्रत्यक्ष अनुभव असतो.अनाहत नादाच्या साथीने सद्गुरु शिष्यास यातून बाह्य जगतात परत आणतात व लोक कल्याणाची कामे करण्यासाठी त्यास उपदेश करतात.

तुज सगुण म्हणू की निर्गुण रे
सगुण निर्गुण एक गोविंद रे

हा सगुणा पासून निर्गुणा पर्यंत आणि निर्गुणात येताच महा शून्याचा महानुभव माऊलींनी घेतला व त्यांचा आत्मा हाच परमात्मा आहे यांचे विषयी त्यांचा निश्चय झाला. ही अवस्था त्यांच्या असा साधनेने परिपुष्ट झाली व त्यांच्या उपादेय हृदयात रखुमाईचा पती तो परमात्मा स्थिर झाला. हा परमात्मा अनेकांना केवळ मुर्तीतच

आहे असे वाटते ही उफराटी कळा म्हणजे चुकीची बाजू आहे असे माऊली म्हणतात.

असे अनुभव जेंव्हा मनात शब्दच नाहीत अशा अवस्थेत मांडले आहेत. हे कोणत्या शब्दात मांडता येतील हे किती कठीण काम आहे ?तरीही माऊलींचे सामर्थ्य इतके की त्यांनी चपखल शब्दात हे दिव्य अनुभव मांडलेले आहेत.

या ज्ञानियांच्या राजास गुरु, महाराजांस विनम्रपणे अभिवादन करून हा लेख इथे संपवितो.

## ।। निरूपण ।।



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**श्रीगणेशो वरं दाता विघ्नहर्ता स्वभावत:।**
**पार्वतीश्वरयो: पुत्र: पातु मां सर्वतोपरि।। १।।**

वर देणाऱ्या, स्वभावाने विघ्न हरण करणाऱ्या, शिवपार्वतीपुत्र अशा श्रीगणेशाने माझे सर्वतोपरी रक्षण करावे.

**खलनिर्दालक: साक्षान्महादेवसुत: प्रभु:।**
**इत ऋद्धिस्तत: सिद्धिर्राराजते गणेश्वर:।। २।।**

साक्षात् महादेवसुत प्रभु दुष्टांचे निर्दालन करणारा आहे. एकीकडे ऋद्धि व एकीकडे सिद्धि असणारा गणेश्वर शोभून दिसतो.

**मेधानामीश्वरस्यास्य त्वोङ्काररूपमद्वयम्।**
**विद्यां ददाति सर्वेभ्य: स जयति महेशज:।।३।।**

बुद्धीचे दैवत असणाऱ्या या देवाचे ओंकाररूप अद्वय आहे. सर्वांना विद्या देणारा तो महेशपुत्र विजयी होतो.

**कुमारस्यानुजोऽयं हि शोभते मूषकोपरि।**
**य: प्रार्थयति यद्यद्धि तस्मै यच्छति सर्वद:।।४।।**

कार्तिकेयाचा हा लहान भाऊ मुषकावर शोभून दिसतो. जो जे जे मागतो त्याला सर्व काही देणारा हा गणेश, ते ते देतो.




## गरोदरपणात तूप स्त्रीच्या आरोग्यासाठी फायदेशीर

ज्योतिर्मय साहित्य

आई होण्याचे स्वप्न पाहण्यापासून ते आई होण्यापर्यंतचा प्रवास स्त्रीसाठी खूप रोमांचक, भावनिक आणि जबाबदार असतो. आईच्या आरोग्यासाठी आणि बाळाच्या विकासासाठी गर्भधारणेपासून नवव्या महिन्यापर्यंत गर्भवती महिलेच्या आहाराची अत्यंत काळजी घेतली जाते. या काळात चांगले अन्न, औषधोपचार, व्यायाम, चांगली पुस्तके, आजूबाजूचे चांगले वातावरण हे खूप महत्त्वाचे आहे. गरोदरपणात भरपूर फळे, भाज्या, पातळ प्रथिने आणि हेल्दी खाण्याचा सल्ला दिला जातो. कारण गर्भधारणेदरम्यान स्त्री जे काही खाते त्याचा तिच्या आणि मुलाच्या आरोग्यावर खूप परिणाम होतो. जेव्हा मूल पोटात वाढत असते तेव्हा त्याची आई त्याच्या अन्नाचा स्रोत असते. आई जे काही खाते ते थेट मुलाला जाते. म्हणूनच अनेक स्त्रिया गरोदरपणात भरपूर तूप खातात.

गरोदरपणात तूप स्त्रीच्या आरोग्यासाठी फायदेशीर

प्रसूती-स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ राम्या काबिलन यांच्या मते, भारतीय स्वयंपाकात वापरल्या जाणाऱ्या मुख्य घटकांपैकी तूप एक आहे. जेव्हा एखादी स्त्री गरोदर असते तेव्हा तिला घरातील वडीलधारी मंडळी तूप खाण्याचा सल्ला देतात. गरोदरपणात

तूप खाणे स्त्रीच्या एकूण आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. हे पचनासही खूप मदत करते.

गरोदर स्त्रीने तूप खाल्ल्यास बाळ सहज बाहेर येते का...?

गर्भवती महिलेने तूप का खावे यावर प्रसूती-स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. रम्या कबिलन यांनी त्यांच्या 'इन्स्टाग्राम' पोस्टमध्ये स्पष्ट केले आहे. तुम्ही गरोदर असताना रोज एक चमचा तूप खा. तूप आईच्या आणि बाळाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. पण अनेकदा असे सांगितले जाते की, गरोदरपणाच्या शेवटच्या महिन्यांत तूप खाल्ल्याने योनीमार्गातून बाळाला सहज बाहेर येण्यास मदत होते. मात्र हे खरे नाही, असे डॉक्टर सांगतात.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

तूप बाळाच्या मेंदू आणि मज्जासंस्थेसाठी फायदेशीर...

पारंपरिक आयुर्वेदिक औषधांमध्ये शतकानुशतके तुपाचा वापर केला जात आहे आणि गरोदर महिलांसाठी याचे विविध आरोग्यविषयक फायदे आहेत. तुपामध्ये आवश्यक जीवनसत्त्वे असतात, जी गर्भधारणेसह बाळाच्या आणि आईच्या आरोग्यासाठी खूप चांगली असतात. गर्भवती महिलांना संपूर्ण गर्भधारणेदरम्यान उत्साही राहण्यास ते मदत करते. मुलाच्या मेंदू आणि मज्जासंस्थेच्या योग्य विकासासही मदत करते.

निरोगी त्वचा...

त्वचेची काळजी घेण्यासाठी आयुर्वेदिक पद्धतींमध्ये तुपाचा वापर अनेकदा केला जातो. गरोदर महिलांना गरोदरपणात त्यांच्या त्वचेत बदल जाणवू शकतात आणि तूप मॉइश्चरायझर म्हणून वापरल्यास किंवा त्वचेची काळजी घेण्यासाठी घरगुती उपाय केल्यास त्वचेचे पोषण आणि कोरडेपणा किंवा खाज कमी होण्यास मदत होते.

## ।। श्री राम कथा ।।





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

कोणाचा दृष्टांत...

विभीषणहाने तुमच्या शिवाय मी कोणास शरण जावे?

भगवान म्हणतात ना मला शरण आला त्याचे रक्षण मी करतो.कारण जगात शरन्य केवळ मी आहे.स्वतःला वेगळे न समजता मला एकरूप होणे हे शरण होय.

बिभीषण आला.चरणावर मस्तक ठेवले सर्व लोकात तुम्हीच एकमेव शरन्य असेल. मी सर्व सोडून आला.मी लंकेचा परित्याग केला.मी मित्रा सोडले धन सोडले.असा निःसंग होऊन आलो.सर्वांना हे आवडले. रामानी त्यास तुला रावण वधानंतर लंकेच्या गादीवर बसविण्याचे वचन दिले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

लक्ष्मण म्हणे तुम्ही असे वचन लगेच द्यायला नको म्हणे. कारण समाज रावण शरण आला तर तुम्ही त्यास मारू शकणार नाही मग याला गादीवर कसे बसविणार?

राम म्हणाले असे झालेच तर मी अयोध्येचे राज्य बिभीषणास देईल.

पुन्हा एकदा सामोपचाराचा प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही.

समुद्रांनी ३ दिवस वाट पाहूनही दिली नाही शेवटी धनुष्य वर बाण चढविला की घाबरून सह कुटुंब प्रकट झाला. तुम्ही सत्र काढल्या शिवाय प्रकट झाला नाहीत. समुद्र म्हणे मी तुमचा पूर्वज आहे तुम्ही माझे वंशज आहात पण खरे सांगतो तुमची मला लाज वाटते, तुमचे तोंड पाहण्याची लाज वाटते.

**(क्रमशः)**

# दवाखाना

## क्षयरोग- भाग ८

**ज्योतिर्मय साहित्य**

नमस्कार मैत्रांनो!

क्षयरोगावर बीपीएएलएम ही सुधारित योजना परिणामकारक संजीवनी ठरली आहे. सहामाही कालावधीमुळे रोग्याकडून सूचनांचे अधिक योग्यरित्या अनुपालन केल्या जाते. टीबीच्या अतिउपद्रवी जिवाणूंविरुद्ध आपण हे प्रभावी कॉम्बो वापरायला लागलोय. भारतात क्षयरोगावरील बहुसंख्य उत्तम दर्जाची औषधे (बेडाक्विलिनसहित) अत्यंत वाजवी दरात उपलब्ध करून देण्यात लुपिन लिमिटेड ही बहुराष्ट्रीय औषध कंपनी अग्रगण्य आहे. सर्व क्षयरोगनिवारक प्रतिजैविकांत सध्या तरी सर्वगुणसंपन्न अर्थात सर्वात नवथर आणि म्हणूनच नवसाचे अपत्य आहे बेडाक्विलिन! मात्र या औषधावर आपण जरा अधिकच भार टाकतोय. चिंतेची बाब म्हणजे अगदी मोजक्याच रुग्णांमध्ये बेडाक्विलिन प्रभावहीन सिद्ध झाले आहे. तेव्हा त्याच्या पुढे काय? आज या यक्षप्रश्नाचे उत्तर आपल्याकडे नाही, पण क्षयरोगाचे निर्मूलन करण्याकरता ते लवकरात लवकर शोधावे लागणार हे नक्की! संबंधित औषध कंपन्यांनी आणि संशोधन करणाऱ्या संस्थांनी लोकहितासाठी त्या दृष्टीने प्रयत्न करावेत असे वाटते !

मंडळी, आता क्षयरोग्याने स्वतःच्या आजाराचा प्रसार होणार नाही आणि आजार लवकरात लवकर बरा होण्यासाठी खालीलप्रमाणे खबरदारी घ्यावी.

खोकताना किंवा शिंकताना नेहमी तोंड आणि नाक टिशूने/जाड कपड्याने झाकावे जेणेकरून टीबीचे जिवाणू असलेल्या थेंबांचा प्रसार रोखता येईल.

थुंकी (कफ) सीलबंद कंटेनर किंवा डिस्पोजेबल टिश्यूमध्ये टाकून हात साबण आणि पाण्याने चांगले धुवावे.

नियमित उपचार घेणे हे किती महत्वाचे आहे हे मी या आधी वारंवार विशद केले आहेच. डॉक्टरांनी दिलेल्या उपचार पद्धतीचे काटेकोरपणे पालन करावे. उपचारादरम्यान कसलाही त्रास झाल्यास डॉक्टरांशी संपर्क साधावा. परंतु, रुग्णाने स्वत:हून औषधे कधीही बंद करु नयेत. आधी सांगितल्याप्रमाणे ही औषधे सरकारी रुग्णालयात मोफत उपलब्ध आहेत. एक महिन्याची औषधे एकत्रितपणे देण्यात येतात. तसेच ही औषधे सेवाभावी संस्थांमार्फत व खासगी डॉक्टरांमार्फत देखील मोफत देण्याची सुविधा आहे. यासाठी आपल्या घराजवळील केंद्र निवडावे. आरोग्यदूताची मदत घेत डॉक्टरांना नियमीत वेळी भेटावे.

शरीराची प्रतिकारशक्ती वाढवायला प्रथिन तसेच जीवनसत्वयुक्त आहार घ्यावा.

राष्ट्रीय क्षय उन्मूलन कार्यक्रम
टीबी मुक्त भारत
टीबी हारेगा देश जीतेगा



**लेखिका**
**डॉक्टर मीना श्रीवास्तव**

आवश्यकतेनुसार सरकारी मदतीचा लाभ घेणे उचित ठरेल. त्याची माहिती आपल्या आरोग्य केंद्रात उपलब्ध असते.

आरोग्यदूताच्या निर्देशाचे संपूर्णरीत्या पालन करीत गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी जाणे टाळावे किंवा अत्यावश्यक असेल तेव्हाच मर्यादित वेळेकरता जावे. अशा वेळी जिवाणूयुक्त थेंबांचा प्रसार रोखण्यासाठी न चुकता सर्जिकल मास्क घालावा. संसर्गजन्य रोग्याने सार्वजनिक वाहनातून प्रवास करू नये.

राहत्या घरात हवा खेळती असावी.

आपले आरोग्य जपण्यासाठी रोग्याने धूम्रपान आणि मद्यपान बंद करावे. रोज प्राणायाम, उपासना, सूर्यनमस्कार, ध्यानधारणा यापैकी जे जमेल त्याचा अंगीकार करावा.

कुटुंब आणि संपर्कांत असलेल्या व्यक्तींनी क्षयरोगाकरता नियमित तपासणी करून घ्यावी, जेणेकरून त्यांना संसर्ग झालाच तर लवकर वैद्यकीय सल्ला घेऊन औषधोपचार योजना सुरु करता येईल.

सरकारतर्फे क्षयरोग निर्मूलनासाठी अनेक प्रयत्न चालू आहेत. रुग्णसंख्या अधिक असलेल्या आणि संसर्गाचा संभावित धोका असलेल्या समुदायासाठी केंद्र सरकारतर्फे १०० दिवसांचे विशेष क्षयरुग्ण शोध अभियान राबवल्या जात आहे. यात मोफत क्षयरोग तपासणी व उपचार सुविधा, क्षयरुग्णांची माहिती देणे आणि व्यवस्थापन यासाठी खाजगी क्षेत्रांचे साहाय्य घेतल्या जात आहे. तपासणी प्रयोगशाळांमध्ये वाढ करणे, क्षयरोगाबाबतचे गैरसमज कमी करणे, जनजागृती व आरोग्यपूर्ण जीवनशैली बाबत मार्गदर्शन देणारे संवादात्मक उपक्रम आयोजित करणे, क्षय रुग्णाच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींसाठी क्षयरोग प्रतिबंधात्मक उपचारांची तरतूद करणे आणि क्षयरुग्णांच्या प्रकृतीचा सातत्याने मागोवा घेत राहणे ही उद्दिष्टे ठरवून राबवण्यात आली आहेत.

मैत्रांनो, यात सामान्य नागरिक म्हणून आपला सहभाग देखील महत्वाचा आहे. सार्वजनिक स्वच्छतेची जबाबदारी आपली आहे. रस्त्यावर थुंकणे टाळावे. घरच्या सांडपाण्याची आणि कचऱ्याची योग्य विल्हेवाट आपली आपणच लावावी. क्षयरोग्यांबद्दल आपुलकी बाळगणे व त्यास उपचार पूर्ण करण्यास मदत करणे अथवा आरोग्यदूत होणे हे देखील आपण करू शकतो.

एक सुजाण नागरिक म्हणून क्षयरोगाविरुद्ध आपण देखील आपले योगदान द्यावे. हा जगन्नाथाचा रथ आपल्या सहकार्याशिवाय पुढे जाणार कसा?

पुढील भागात नवीन विषयावर चर्चा करू या !

# शंकरराव भेलके महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा



**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त भावनिक आणि मानसिक दृष्ट्या संतुलित राहण्यासाठीची तसेच दररोज खेळ खेळण्याची आणि दुसऱ्यांना खेळासाठी तसेच तंदुरुस्त राहण्यासाठी प्रोत्साहन करू अशी शपथ घेतली.

हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात बुद्धिबळ मुले मुली स्पर्धा, त्याचबरोबर टेबल टेनिस मुले मुली स्पर्धा आयोजित करण्यात आल्या बुद्धिबळ स्पर्धेमध्ये दरेकर हर्षद याने प्रथम क्रमांक नोंदवला तर दरेकर मेघनाथ याने द्वितीय क्रमांक नोंदवला. मुलींमध्ये खोपडे मानसी हिने प्रथम क्रमांक नोंदवला तर मिरकुटे आरती हिने द्वितीय क्रमांक नोंदवला.

टेबल टेनिस मुले स्पर्धेमध्ये सुजल खुटवड याने प्रथम क्रमांक मिळवला तर विकी धरणाल याने द्वितीय क्रमांक मिळवला टेबल टेनिस मुली स्पर्धेमध्ये मेहेक शेख हिने प्रथम क्रमांक मिळवला साक्षी चांदगुडे हिने द्वितीय क्रमांक मिळवला सर्व यशस्वी खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ तुषार शितोळे, शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. पौर्णिमा कारळे, प्राध्यापक वृंद व प्रशासकीय कर्मचारी यांच्यातर्फे हार्दिक अभिनंदन केले.

या स्पर्धेचे आयोजन शारीरिक शिक्षण संचालिका पौर्णिमा कारळे, डॉ.जगदीश शेवते, प्रा. सहदेव रोडे, डॉ. रोहिदास ढाकणे, ग्रंथपाल प्रा.भगवान गावित, डॉ.सचिन घाडगे, प्रा.गणपत आवटे, प्रा.जीवन गायकवाड, प्रा.दयानंद जाधवर, प्रा.माउली कोंडे, प्रा.महेश कोळपे, प्रा.भूषण समगीर, प्रा.ऐश्वर्या धुमाळ, प्रा.अंकिता महांगरे, वैष्णवी कोंडे, विकास ताकवले, आशिष परमार, सीमा देशमुख, मनीषा मोहिते, धनाजी माने, सुमित कांबळे, अभिषेक मोरे इ. यांनी प्राचार्य तुषार शितोळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली केले

# होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल संस्कृत अनुरागी शाळा पुरस्काराने सन्मानित; संस्कृत प्रतिष्ठान संस्थे तर्फे दिला जाणारा



**ज्योतिर्मय साहित्य**


डॉ.चंपालाल देसरडा संस्कृत अनुरागी शाळा पुरस्कार २०२५ , ह्या वर्षी होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल शाळेला मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संस्कृतदिनाच्या औचित्याने संस्कृत भाषेच्या प्रचार व प्रसाराच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. जी शाळा विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत भाषेचे जतन करते व शिकण्यासाठी प्रोत्साहन देते, वर्षभरात संस्कृत विषयक स्तुत्य उपक्रम घेते त्या शाळेला हा पुरस्कार देण्यात येतो.पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, रोख रक्कम आणि प्रमाणपत्र असे होते. संस्थेच्या वतीने हा पुरस्कार शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर सिंथिया फर्नांडिस, शाळेचे संस्कृत शिक्षक गिरीश जोशी, अनिरुद्ध महाजन ह्यांनी स्वीकारला. यावेळी विनोद कुलकर्णी,श्रीमती देसरडा मॅडम, डॉ.क्रांती व्यवहारे, डॉ नवल थोरात, डॉ पंकजा वाघमारे, डॉ अजय निलंगेकर इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

या पुरस्कारानिमित्त होली क्रॉस शाळेच्या सिस्टर सिंथिया फर्नांडिस, उपमुख्याध्यापिका सिस्टर जिनी, पर्यवेक्षक मोहम्मद हाफिजुद्दीन, सर्व शिक्षकवृंद ह्यांनी संस्कृत शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



**भगवती सेवा अश्रम व जीवन कौशल्य विकास अंतर्गत मनपा प्राथमिक शिक्षण विकास यांचीमॉडेल इंग्लीश स्कूल क्र.८७,औंध येथे मातीहपासून पर्यावरण पूरक गणेशमूर्ती निर्माण करण्याची कार्यशाळा संपन्न झाली. त्यात एकूण १८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोदवला.शाळेचे मु. आ.,कला शिक्षक,व इतर सहशिक्षकांनी बहूमोल मार्गदर्शन केले होते. कार्यक्रम संकल्पक पथक सर्वश्री गीरीधर राठी, प्रकाशराव बोकील, डॉ.श्याम कुलकर्णी, व्यकंटरमण अय्यार, रामधनी यांनी कार्यशाळा यशस्वी केली.**









# आधी वंदू तूज मोरया...

## ॥ कळंबचा चिंतामणी गणपती ॥

**ज्योतिर्मय साहित्य**

पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे विदर्भात देखील गणपतीची आठ महत्त्वाची मंदिरे आहेत, ह्या श्रीगणेशाच्या मंदिरांना 'विदर्भातील अष्टविनायक' म्हटले जाते. १. टेकडी गणपती, नागपूर, २. शमी विघ्नेश, आदासा (जिल्हा-नागपूर), ३. अष्टदशभुज, रामटेक (जिल्हा-नागपूर), भृशुंड, मेंढा (जिल्हा-भंडारा), ५. सर्वतोभद्र, पवनी (जिल्हा-भंडारा), ६. सिद्धिविनायक, केळझर (जिल्हा-वर्धा), ७. चिंतामणी, कळंब (जिल्हा-यवतमाळ) आणि ८. वरदविनायक, भद्रावती (जिल्हा-चंद्रपूर).

विदर्भातील अष्टविनायकांपैकी एक असलेले हे चिंतामणी गणपतीचे मंदिर यवतमाळ - नागपूर या राज्य महामार्गावर यवतमाळ शहरापासून सुमारे २३ कि. मी. अंतरावर असलेल्या कळंब गावात आहे. चिंतामणीचे मंदिर गावाच्या सामान्य जमिनीचे पातळी पेक्षा सुमारे ३५ फूट खोलीवर आहे. मंदिराच्या प्रवेश द्वारातून पायऱ्या उतरून खाली गेल्यावर समोर एक कुंड दिसते. या कुंडाला गणेशकुंड असे म्हणतात. यातून सुमारे दर १२ वर्षांनी आपोआप पाणी वर येते. हे कुंड गणपतीने अंकुशाच्या प्रहाराने तयार केले तर या मंदिराची स्थापना देवराज इंद्राने केली असल्याचे मानतात.

ब्रह्मदेवाने एक लावण्यवती स्त्री निर्माण केली, तिला आपली मुलगी मानले. त्याने या मुलीचे नावही ठेवले. तिच्या लावण्याने देव, दानव, मानव, यक्ष, किन्नर, गंधर्व, नाग वगैरे सगळेच मोहित झाले होते. तिचा विवाह करावा असे जेव्हा ब्रह्मदेवास वाटले तेव्हा त्याने एक पण जाहीर केला, त्यानुसार जो कोणी प्रथम पृथ्वी प्रदक्षिणा करून येईल त्यालाच तिच्याशी विवाह करता येणार होता. पण ऐकून सारेच पृथ्वी प्रदक्षिणेसाठी निघाले. हा पण, वार्ता आर्यवर्तातल्या महर्षी गौतम यांच्या कानावरही आला. त्यांनी प्रसूत होणाऱ्या आश्रमातील गायीस प्रदक्षिणा घालून ब्रह्मदेवाकडे शास्त्राप्रमाणे तिची मागणी केली. ब्रह्मदेवाने शास्त्राधार मान्य करून महर्षी गौतम यांना आपली कन्या प्रदान केली.

पृथ्वी प्रदक्षिणेसाठी गेलेल्या मंडळीतील देवराज इंद्र सर्वप्रथम परत आल्यावर त्याला तिच्या विवाहाची बातमी कळली. पण विवाह झाला असल्याने काही उपाय नव्हता. तिच्या लावण्याने इंद्र घायाळ झाला होता. महर्षी गौतम आपल्या आश्रमात नाहीत असे पाहून इंद्राने गौतमाचा वेष धारण करून तिच्याशी दुराचार केला. महर्षी गौतम यांना हे कळताच त्यांनी इंद्राला महारोगी होण्याचा शाप दिला. इंद्राने महर्षी गौतम यांची क्षमा मागितल्यावर गौतम ऋषींनी गणेश षडाक्षर मंत्राचा उपदेश इंद्रास केला आणि विदर्भात करंब (कळंब) येथे जाऊन श्री चिंतामणीची तपश्चर्या करण्यास सांगितले. इंद्राच्या तपश्चर्येने श्री गणेश प्रकट झाले आणि त्यांनी आपल्या अंकुशाने एक कुंड निर्माण केले. या कुंडातील पाण्याने स्नान करून इंद्राचा रोग नाहीसा झाला. तेव्हापासून या पाण्याने पापक्षालन होते असे मानतात. स्नान झाल्यावर इंद्राने तेथेच गणेशाची स्थापना केली



आणि गणेश अभिषेकासाठी स्वर्गातून गंगेला पाचारण केले आणि तिला आदेश दिला की दर १२ वर्षांनी तिने पृथ्वीवर येऊन श्री गणेशाच्या पायाला स्पर्ष करून जावे. तेव्हापासून दर १२ वर्षांनी कळंबच्या मंदिरातील कुंडातून गंगा वर येते आणि देवाच्या चरणांना स्पर्श करून निघून जाते. हे दृश्य पाहण्यासाठी मंदिरात लाखो लोक जमतात. मागील काळात सन १९१८, १९३३, १९४८, १९५८, १९७०, १९८३ आणि १९९५ या वर्षी मंदिरातील कुंडातून गंगा अवतरली आहे अशी माहिती समजते.

गणेश कुंडाच्या समोरच मुख्य गाभाऱ्यात श्री चिंतामणीची दक्षिणाभिमुख मूर्ती आहे. ही श्री गणेशाची जगातील एकमेव दक्षिणाभिमुख मूर्ती असल्याचे मानले जाते. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या समोर असलेल्या सभामंडपाची निर्मिती बालगंधर्व यांनी केली आहे. यवतमाळ येथे झालेल्या एका कार्यक्रमाची संपूर्ण मिळकत त्यांनी या कामी खर्च केली.

गणपतीचं दर्शन घेतलं की चिंतेतून मुक्ती मिळते. कुठलंही संकट आलं तर भाविक या ठिकाणी येऊन आपल्यावरचं संकट या चिंतामणीला सांगतात. त्यामुळं त्यांची संकटातून मुक्ती होते, अशी श्रद्धा इथल्या भाविकांची आहे. त्यामुळं विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रातून त्याचबरोबर इतर राज्यातूनही इथे मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. आपणही एकदा चिंतामणीचे दर्शन अवश्य घ्यावे.




त्यासोबतच ह्या भागात, लोहारा-महादेव मंदिर, ढुमणापूरला-मारूतीचे मंदिर प्रसिद्ध आहेत. खटेश्वर महाराज आश्रम जवळच आहे. जवळच्या परिसरात, किनवट तालुक्यात श्री क्षेत्र माहूर रेणुका माता मंदिर आहे.दत्तशिखर, याठिकाणी दर्शन घेवू शकतात.

॥ ॐ गं गणपतये नमः ॥

## ! गणपतीला हत्तीचे तोंड कसे !

**ज्योतिर्मय साहित्य**

श्री शिवपुराणात गणेश जन्मा विषयीची माहिती थोडी वेगळी आहे .पण श्री मुदगल पुराणातील चौथ्या खंडात शंकर पार्वतीच्या घरात श्री गणेशाच्या जन्माची कथा अत्यंत सुरसपणे वर्णन केलेली आहे.

आदिमाया आदिशक्ती पार्वतीस स्नानाला जावयाचे होते. त्यावेळी घराचे रक्षण करण्यासाठी कुणी रक्षक नव्हता. तेव्हा तिने आपल्या अंगावरील चंदनाची उटी जी लावलेली होती. स्नानाच्या तयारीत असलेल्या पार्वतीने मग आपल्या अंगावरील चंदनाच्या उटीच्या लेपा पासून एक छोट्या बालकाची पुरुषाकृती तयार केली. आदिशक्ती पार्वतीने आपल्या सामर्थ्यातून त्याला सजीव केले. त्या बालकाला पार्वतीने दरवाज्यावर रक्षणाचे काम करण्यास सांगितले. मी स्नानाला जात आहे तू कोणालाही आत घरात सोडायचे नाही असे पार्वतीने त्याला आदेश दिले.

तो बालक आपल्या घराचे रक्षण करण्यासाठी उभा होता. कांही वेळानंतर स्वतः शंकर लगबगिने आपल्या गणांच्या सोबत तेथे आले. त्या बालकाने सर्वांनाच अडवले. शंकराचं आत येण्यास मनाई केली. हा आडदांड बालक कोण आणि कुठला आणि त्याने शंकरांना आणि त्यांच्या गणांना आत येण्यासाठी अडवले. त्यावेळेस शंकर संतप्त झाले आणि मग त्यांनी त्या बालकाच्या बरोबर युद्ध सुरू केले. त्या बालकाने पण त्या गणांवर प्रहार करून पिटाळून लावले. आदीमाने आदी मायेने तयार केलेल्या या बालकाचे बळ पाहून शंकर आश्चर्यचकित झाले. सरते शेवटी शंकराने आपल्या गणांना निष्प्रभ करणाऱ्या या बालकावर त्रिशूल सोडले आणि त्याचा शिरच्छेद केला. थोड्या वेळानंतर पार्वती बाहेर आल्यानंतर तिला हा प्रकार समजला. आपल्या सामर्थ्याने या बालकाला जिवंत करण्याचे तीने ठरविले त्यावेळेस शंकरालाही साऱ्या गोष्टी समजल्या पार्वतीवर अपार प्रेमासाठी त्यांनी या बालकास जिवंत करण्याचे ठरवले. मग शंकराने लगबगीनी बाहेर वनातून जाणाऱ्या या गजासुराचे शीर कापून आणले आणि ते या बालकाच्या मस्तकावर लावून शंकराने स्वतः त्यात जिवंत केले.

**सुधीर कोर्टीकर**
**मो.९७६५५५३३१२**

आपला बालक जिवंत झालेला पाहून पार्वतीला आनंद झाला. पार्वतीच्या आनंदात शिवही आनंदून गेले. दोघांना त्या बालकांनी वंदन केले. मग त्या दोघांनी आपल्या या बालकाला पुत्र मानून आशीर्वाद दिले. तोच हा गौरीनंदन.. गजानन आणि अशा तऱ्हेने गणपतीला त्या दिवसापासून हत्तीचे तोंड आले.

***

## गणेशोत्सव : टिळकांच्या प्रेरणेपासून 'राज्य महोत्सव'पर्यंतचा प्रवास

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय संस्कृतीतील सर्वाधिक लोकप्रिय उत्सवांपैकी एक म्हणजे गणेशोत्सव. महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात हा उत्सव जल्लोष, भक्तिभाव आणि सामूहिकतेच्या भावनेत साजरा होतो. हा सण सर्व समाजात आणि घराघरात लोकप्रिय आहे. या उत्सवाचा इतिहास केवळ धार्मिकतेशी जोडलेला नसून, त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक आयामही गुंफलेले आहेत. लोकमान्य टिळकांनी जुलमी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती व जनतेला संघटित करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याची प्रथा सुरू केली. या माध्यमातून सामाजिक एकोपा संघटनात्मक चळवळी तसेच कला व सांस्कृतिक उपक्रम सुरु करण्याचे त्यांचे धोरण होते. महाराष्ट्र शासनाने आता एक पाऊल पुढे टाकत या गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव राज्य वैभवी बाण्यामध्ये महाराष्ट्रात सर्वत्र सुरु आहे.

**टिळकांचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय**

सन १८९३ साली लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्या काळात ब्रिटिश सत्तेखाली भारतीय समाज उभारी घेऊ शकत नव्हता. सामूहिक संघटनेला दडपशाही होती. परंतु, टिळकांनी गणेश उत्सव हा घराघरातील कौटुंबिक वातावरणातून बाहेर आणला आणि त्याला सार्वजनिक व्यासपीठ दिले. हा निर्णय केवळ धार्मिक नव्हता तर सामाजिक एकात्मता आणि राजकीय जागृती घडवून आणणारा होता. मंदिर किंवा घरात मर्यादित राहिलेला आनंद लोकांच्या, समूहांच्या विविध जाती-पंथांच्या मान्यतेला उतरला. उत्सवाचे सार्वत्रिकरण झाले. पुढे हळूहळू समाजाला एकत्र आणणारा हा उपक्रम बनला.

**गणेशोत्सवाचे प्रदेशनिहाय स्वरूप**

महाराष्ट्रातील विविध भागांत गणेशोत्सव वेगवेगळ्या पद्धतींनी साजरा केला जातो. कोकणात हा उत्सव संस्कृतीला उजाळा देणारा असतो. गावी जाऊन कुटुंबासोबत उत्सव साजरा करणे ही कोकणातील वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. नारळी पोर्णिमा ते विसर्जनापर्यंत निसर्ग, समुद्रकिनारे आणि पारंपरिक घरगुती पूजा यामध्ये एक विलक्षण उत्साह व एकोप्याचे वातावरण अनुभवता येते. या भागातील मूळ कला संस्कृतीची जोपासना व सादरीकरण या काळामध्ये केली जाते. विदर्भ, मराठवाड्यात नाटक, कला, संस्कृती, कवी संमेलन आणि विविध गुण प्रदर्शनाचे आयोजन करणारा महोत्सव म्हणजे गणेश महोत्सव. नागपूर, अमरावती, चंद्रपूर यांसारख्या शहरांमध्ये गणेशोत्सवाला विसर्जन मिरवणुकीला अनेक वर्षाची परंपरा आहे. विदर्भातील अनेक नामवंत व्याख्यानमाला या काळामध्ये आयोजित केल्या जातात. सांस्कृतिक कार्यक्रमांची सर्वाधिक रेलचेल या काळात असते.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर,**
**९७०२८५८७७७**


पुण्यातील अनेक ऐतिहासिक गणपती मंडळांना शंभर वर्षांहून अधिक परंपरा आहे. अनेक मानाची मंडळे आजही परंपरेचे जतन करतात. सांस्कृतिक स्पर्धा, नाटकं, कीर्तनं आणि शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम हे वैशिष्ट्य येथे जपले जाते. देश विदेशातील कलाकारांना स्थान देणारे अनेक फ ेस्टिवल, उत्सव,कार्यक्रम या काळात पुण्यामध्ये साजरे होतात. पुण्यातला गणेशोत्सव बघायला देशभरातून नागरिक या काळात पुण्यामध्ये येत असतात.

मुंबई म्हणजे गणेशोत्सवाचा महासागर, गिरगावातून सुरु झालेला हा सार्वजनिक उपक्रम या महानगराची ओळख झाला आहे. चाकरमान्यांची सुट्टी, बाजारपेठेत वाढलेली उलाढाल आणि कला-उद्योगाला मिळणारी चालना यामुळे मुंबईतील गणेशोत्सवाला खास आर्थिक महत्त्व आहे. महाराष्ट्रातील सिने, नाट्य कलावंतांचे शहर असणाऱ्या मुंबईमध्ये कला जगताने देखील गणेश उत्सवाला चालना दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी देखील या काळात बाप्पा विराजमान असतात. प्रत्येक सोसायटीत होणारा गणेशोत्सव, सार्वजनिक सहभागाचे आदर्श उदाहरण ठरते. शिवाय सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देशभराच्या खाद्य संस्कृतीलाही चालना मिळते.

**उत्सवाचे स्वरूप : धार्मिकतेपासून वार्षिक आनंदोत्सवापर्यंत**


गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे पूजा किंवा कर्मकांडामध्ये कोणतीही अनिवार्यता नाही. कोणत्याही जाती, धर्मातील व्यक्ती या उत्सवात सहभागी होऊ शकतात. म्हणूनच हा उत्सव एका धार्मिक मर्यादेपलीकडे जाऊन सामूहिक वार्षिक आनंदोत्सवाचे स्वरूप धारण करतो. दीड दिवस, अडीच दिवस, पाच दिवस, दहा दिवस अशा विविध कालावधीत हा उत्सव आपआपल्या पद्धतीने साजरा केला जातो. शेकडो बाल गणेश मंडळे, सार्वजनिक कार्यक्रमांच्या बिजारोपणासाठी प्रेरणास्त्रोत होऊन जातात. मुलांमध्ये संघटन शक्ती, कला, कौशल्य, नेतृत्व. विकासासाठी हा महोत्सव पुढे येतो. महाराष्ट्रामध्ये घडलेल्या शेकडो कलाकारांना गणेश महोत्सवाच्या व्यासपीठानेच पहिली संधी दिली आहे. हा जागर आताही कायम आहे.

**(क्रमशः)**













हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559